पाक्षिक | शेतकरी संघटक | वर्ष १० वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | अंक १९ वा
किंमत १ रुपया २५ पैसे | २१ जानेवारी १९९४

# मागणं लई न्हाई....

- शरद जोशी

मार्च १९९५ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या विद्यमान विधानसभेची मुदत संपते. ९५ सालाच्या सुरुवातीला कधीतरी राज्यातील निवडणुका होतील. मतदारांना ओळखपत्रे देण्याचा आग्रह मुख्य निवडणूक आयुक्तांनी धरला आहे. या किंवा अशा दुसऱ्या तांत्रिक अडचणी आल्या नाहीत तर निवडणुका येत्या वर्षभरात पार पडतील.

निवडणुकीचे वारे खेळू लागले आहेत. उत्तरे प्रदेशात आपण का जिंकलो हे न समजल्यामुळे आता सगळ्या देशात कोणत्याही राज्यात बहुजन समाज पक्षाचा मुख्यमंत्री आपण आणू शकतो अशा थाटात काशीराम मुंबईला आले. पहिल्यांदा आले ते जाहिरात फडकावून गेले, १६ जानेवारी रोजी तीन लाखाची सभा करतो म्हणून शड्डू ठोकून गेले, प्रत्यक्षात सभेला तेरा हजार लोक हजर असल्याची पोलिसी नोंद आहे. मंचावर काशीराम आले एवढेच नव्हे तर विनानिमंत्रणाचे विश्वनाथ प्रतापसिंगही आले. मंचावर बसून, समोरच्या समुदायाने दिलेल्या 'देश का नेता कैसा हो । काशीराम जैसा हो ।' अशा घोषणा त्यांना ऐकाव्या लागल्या.

पुरोगामी लोकशाही आघाडी संपल्यात जमा आहे. त्यांना निवडणुकीची तयारी करणे आवश्यक नाही. या उलट, शरद पवार दोन वेगवेगळ्या निवडणुकींची तयारी करीत आहेत. आपण महाराष्ट्रात आलो, बॉंबस्फोटांचा तपास केला, जातीय दंगली शमवल्या, भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता काही अफलातून कामगिरी करून दाखविली, नामांतर घडवून आणले, केंद्र शासनाकडून विकास मंडळाची घोषणा आज-उद्या होईलच, पुण्यातील राष्ट्रीय खेळांच्या झगमगाटात मिरवत बेळगावच्या प्रश्नालाही हात घालतो म्हटले की पुढची निवडणूक महाराष्ट्रात काँग्रेस, पूर्वी कधी नव्हे इतक्या मताधिक्याने जिंकेल आणि आपण वाजतगाजत दिल्लीला जाऊ अशी शरद पवारांची एक योजना आहे. मध्यंतरीच्या काळात काँग्रेसमध्ये राहाणे अशक्य झाले तर महाराष्ट्राचे 'मुलायमसिंग' आपणच बनू, दलित आणि मागासवर्गियांचा भरघोस पाठिंबा नामांतराच्या पुण्याईवर मिळाला तर इतर समाजातील काही मते गमावली बिगर काँग्रेस मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात बस्तान बसविण्याचीही तयारी चालू आहे. मुलायमसिंग आणि काशीराम जोडीची व्यूहरचना करणारे चंद्रशेखर बारामतीला येऊन गेले आणि दोनतीन दिवस महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसोबत ते राहिले याचे इंगित हे आहे.

काँग्रेसमध्ये राहिलो तर पंतप्रधान, न राहिलो तर, गेलाबाजार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री अशा डावपेचांकरिता शरद पवार नामांतराचा जुगार खेळले. तो त्यांच्या अंगावर उलटण्याची दाट शक्यता तयार झाली आहे. मुंबईत जातीय दंगली झाल्या तेव्हा संरक्षण मंत्री असलेले शरद पवार मुंबईत तळ ठोकून बसले आणि पोलिसांच्या कामात ढवळाढवळ करू लागले. आज मराठवाडा पेटला आहे, पण तेच शरद पवार स्वतः मुख्यमंत्री असतांना राष्ट्रीय खेळांच्या आसपास घिरट्या घालत आहेत, मराठवाड्यात फिरकले देखील नाहीत. याचा फायदा शिवसेनेला मिळणार आहे. डिसेंबर ९३ च्या मध्यवधी निवडणुकीनंतर जवळजवळ संपत आलेली ही सेना आणि तिचे वाघ पुन्हा एकदा डरकाळ्यासदृश आवाज काढीत फिरू लागले आहेत.

इस्लामपूरहून, महाराष्ट्रात मध्यावधी निवडणुका घेण्याची आणि या निवडणुका नामांतराच्या प्रश्नावर लढविण्याची तयारी मुख्यमंत्र्यांनी दाखविली. निवडणुकीच्या राजकारणापोटी साऱ्या राज्यभर जातीय दंगलींचा वणवा शिलगावण्याचा धोका हे सत्तातूर सर्व विधिनिषेध आणि संकोच सोडून करू लागले आहेत.

महाराष्ट्रातील पुढची निवडणूक नामांतराच्या प्रश्नावर व्हावी ही कल्पना कोणा जबाबदार माणसाच्या तोंडून बाहेर पडावी हे चित्रच मोठे भयानक आहे. सगळ्या राष्ट्रात आणि महाराष्ट्रात इतक्या जटिल समस्या आणि बिकट प्रश्न आहेत, त्या सर्वांना बाजूस सारून नामांतराच्या प्रश्नावर निवडणुका घेणे म्हणजे निव्वळ जातींच्या मतांचे राजकारण करणे आहे. सर्वसामान्य लोकांच्या नजरेत नामांतर, विकास महामंडळे, सीमावाद हे सगळे किरकोळ प्रश्न आहेत. लोकांना दररोज जाळणाऱ्या चिंता वेगळ्या आहेत. लोकशाही आणि निवडणुका या कल्पनांना काही अर्थ उरला असेल तर निवडणुकांच्या निमित्ताने विचारमंथन या महत्त्वाच्या समस्यांवर व्हायला पाहिजे.

लोकांच्या महत्त्वाच्या आशाआकांक्षा काय आहेत? फार साध्या आणि सोप्या आहेत.

सगळ्यात पहिल्यांदा, लोकांना एक सरकार हवे आहे; काम करणारे सरकार हवे आहे; शहरात, गावात, वस्तीत, गल्लीत कायद्याचे

राज्य आणि शांतता राखू शकणारे सरकार पाहिजे आहे. घरातली कर्ती माणसे, शाळा कॉलेजांत जाणाऱ्या मुली घरी परतून यायला जरा उशीर झाला तर आता ती जिवंत दृष्टीला पडत नाहीत अशा भीतीने घरात पोहोचलेली माणसे चिंताग्रस्त होऊन जातात. सगळीकडे दादांचे, गुंडांचे, त्यांच्या हस्तकांचे साम्राज्य पसरले आहे. त्यांची पोच पोलिस स्टेशनांपर्यंत नव्हे तर, मंत्र्यांपर्यंत आहे. दादांनी पुरविलेल्या पैशांवर पुढारी मंत्री होतात आणि पुढाऱ्यांना पैसे पोहोचवून तरुण उमेदवार पोलिसखात्यात प्रवेश मिळवितात आणि जन्मभर वरपर्यंत हप्ते पोहोचवत राहातात, आणि खालून हप्ते उकळत राहतात. सर्वसामान्य लोकांना विश्वास वाटेल असेल पोलिस खाते हवे आहे. पोलिस स्टेशनात दादाचा रुबाब आणि सज्जन नागरिकांना दमदाटी हे चित्र बदलायला हवे आहे.

जीवित सुरक्षित झाले तर लोकांना प्रामाणिकपणे कष्ट करून कमावण्याची आणि आपल्या चिल्लापिल्लांच्या चोचीत चारा घालण्याची इच्छा आहे. त्यांची मागणी रोजगाराची नाही किंवा सरकारी नोकरीचीही नाही. ते नोकऱ्यांकरिता धावपळ करताना दिसतात कारण आजच्या व्यवस्थेत घाम गाळून, कष्ट करून हिमतीवर कोणताही व्यवसाय यशस्वी होत नाही असा त्यांचा अनुभव आहे. मिळकत भरपूर आणि काम काही नाही असे फक्त सरकारी नोकरीतच घडते म्हणून नाइलाजापोटी नीच कर्माच्या नोकरीत शिरण्याची धडपड चालू असते. विखारी गरीबीच्या स्थितीत घरातील तरुण मुलींनी देहविक्रय करायला तयार व्हावे त्याप्रमाणे तरुण मुले निराशेपाटी सरकारी नोकरदार बनून आरामात जगण्याची स्वप्ने पाहातात. कायदा, सुव्यवस्था राखण्याकरिता सरकार हवे, बलिष्ठ सरकार हवे. या उलट, आर्थिक क्षेत्रात सरकार अजिबात नको, तेथून त्याची हकालपट्टी झाली पाहिजे अशी लोकांची तळमळ आहे. लायसन्स परमिटांचा जाच नसावा. आशाळभूत इन्स्पेक्टरांचा काच नसावा, नोकरशहांची भरती करण्याकरिता करांचा बोजा नसावा. सरकार किमान कर लावणारे टाकटुकीने कारभार सांभाळणारे काटकसरी असावे. बहुतेक सरकारी खाती आणि त्यांवरील खर्च अनावश्यक आहेत ती खाती बंद करावी. त्या खात्यांत पंख्याखाली आरामात गप्पाटप्पा करणाऱ्या आणि स्वेटर विणणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना धरणे, कालवे, पिण्याचे पाणी, रस्ते, लोहमार्ग असल्या कामांवर पाठवून त्यांच्याकडून उपयुक्त काम करून घ्यावे. सरकारी करांची पद्धत साधी सोपी असावी. करवसुली अधिकाऱ्यांना लोकांना जाच करण्याची शक्यता नसावी. सरकारचे काम शासन असावे, पणन नाही.

लोकांची आणखी एक छोटीशी इच्छा आहे. राजकारण्यांनी सगळ्या समाजाला नासवून टाकले आहे. जेथे जावे तेथे पुढाऱ्यांचाच जोम. गल्लीपासून ते महारस्त्यांपर्यंत, बंदरापासून विमानतळापर्यंत, केशकर्तनालयापासून विद्यापीठापर्यंत, खेळांच्या सामन्यांपासून क्रीडांगणांपर्यंत जिकडे तिकडे पुढाऱ्याचीच नावे. मुलांना शाळेत घालावे म्हटले तर शाळाही पुढाऱ्यांच्या हाती, कॉलेजेही पुढाऱ्यांच्या हाती. वर्तमानपत्रांवर दबाव पुढाऱ्यांचा आणि न्यायाधीशही सत्ताधाऱ्यांपुढे लाचार. जिवाची शाश्वती मिळाली, सन्मानाने पोट भरण्याची व्यवस्था झाली तर मोकाट सुटलेल्या पुढाऱ्यांना कोंडवाड्यात घालून विद्वान, कलाकार, साहित्यिक, शास्त्रज्ञ, खेळाडू, तत्वज्ञानी आपापल्या क्षेत्रामध्ये पुढाऱ्यांना सलाम न घालता आनंदात रममाण होऊ शकतील असे जग झाले म्हणजे या पलिकडे सामान्यांना काही नको.

जनसामान्यांना प्रामाणिकपणे जगणे अशक्य करायचे आणि केवळ जगू देण्याकरिता त्यांना आपल्यासमोर वाकवायचे. झोपडपट्टीतले गुंडदादा जे करतात तेच राज्याचे मुख्यमंत्री करतात आणि तेच पंतप्रधानही करतात. अशा परिस्थितीत स्वातंत्र्याची पन्नास वर्षे उलटून गेली, कल्याणकारी समाजवादी नेहरूवादी वल्गनांचे पितळ उघडे पडले. या पुढच्या निवडणुकातरी स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा लोकांना स्वारस्य असलेल्या प्रश्नांवरच्या निवडणुका होतील अशी आशा वाटत होती, तीही विफल होते का काय अशी चिंता वाटत आहे. प्रदेशाच्या, जातीच्या प्रश्नांवर लोकांना भडकावून देऊन सत्ता टिकवू पाहणारे शरद पवार आणि मिळवू पाहाणारे बाळासाहेब ठाकरे यांच्याखेरीज तिसरा कोणी पर्याय लोकांच्या समोर येण्याची लक्षणे आजरी दिसत नाहीत.

● ● ●

# १९७१ ते १९९५

**सरकारवादी नेहरूव्यवस्थेला शेतकरी आंदोलनाने १९८० सालापासून सतत विरोध केला. गांधीजींच्या नेतृत्वाखालील स्वराज्याची चळवळ स्वातंत्र्य मिळताच समाजवादी आणि सरकारवादी कशी बनली?**

**स्वातंत्र्यानंतरचे भारताचे पहिले गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालचारी (राजाजी) यांनी लिहिले आहे,**

**"श्री. जवाहरलाल नेहरू केंब्रीजहून परतले ते समाजवादामुळे सर्वंकष शासनव्यवस्था लोकजीवनात केवढा आनंद आणू शकेल असल्या कल्पना डोक्यात घेऊनच. आपला हा विचार गांधींच्या प्रभावाखालील काँग्रेसवर लादण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. पण सत्तेच्या खुर्चीवर दैदीप्यमान स्वराज्य आंदोलनाचा एकमेव वारसदार म्हणून स्थिर होईपर्यंत त्यांना यश मिळाले नाही. नंतर मात्र त्यांना संधी मिळाली आणि इतिहासाने खोटी ठरविलेली सरकारवादी विचारसरणी काँग्रेसने स्वीकारली.**

**"सरकारवादी विचारसरणी जगभर अनुभवाने खोटी ठरली आहे तरी नेहरू आपल्या मताला चिकटून आहेत. सारे जग आता स्वातंत्र्याकडे वळत आहे हे त्यांच्या डोळ्याला दिसत नाही."**

**स्वराज्य साप्ताहिकाच्या २१ ऑक्टोबर १९६१ च्या अंकातील राजाजींच्या लेखातील अवतरण कालच्या वर्तमानपत्रात असावे इतके ताजे आहे. राजाजींनी स्पष्ट इशारा दिला होता. देशाने त्याकडे दुर्लक्ष केले. नेहरूंच्या व्यक्तिमत्वाने भारून गेलेला देश त्यांचा हात धरून चुकीच्या दिशेने चालत राहिला आणि दिवाळखोर झाला.**

**राजगोपालचारींचे परिस्थितीचे आकलन किती अचूक होते याचे आजही आश्चर्य वाटावे.**

**१९७१ साली राजाजींच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र पक्षाने एक लहानशी पुस्तिका प्रसिद्ध केली होती. आगामी निवडणुकांत ती थोडीशी अद्ययावत करून जशीच्या तशी वापरली तर ती २५ वर्षांपूर्वी तयार केली आहे हे कोणाच्या लक्षातसुद्धा येणार नाही.**

**या पुस्तिकेचे स्वैर मराठीकरण →**

# ....१९७१ ते १९९५

१९४७ : आपण स्वतंत्र झालो

१९५० : समृद्धीसाठी विकासयोजना आखल्या

१९७१ : २१ वर्षांतील उपलब्धी – गरीबी

समृद्धीसाठी उत्पादन हवे

उत्पादनासाठी काम करायला हवे

काम करण्याची प्रेरणा – स्वातंत्र्य

स्वातंत्र्य : निर्मितीचे, कमावण्याचे, बचतीचे

समाजवादी नेहरूराज्याने

खच्चीकरण केले....

| | |
|---|---|
| उत्पादनाचे | कमाईचे |
| खर्चाचे | बचतीचे |
| संपत्तीचे | औदार्याचे.... |

आपण काही उत्पादन केले तर

आपण राज्य किंवा

केंद्र शासनाला **उत्पादन शुल्क** देतो.

आपला माल बाजारच्या गावी

घेऊन गेलो की आपण **जकात** भरतो.

# ....१९७१ ते १९९५

खरेदी केलेल्या जवळ जवळ प्रत्येक

वस्तूवर आपण **अप्रत्यक्ष* कर** भरतो.

* सीमाशुल्क

+ अबकारी कर

+ जकात कर

आपण काही कमाई केली की

आपण **प्राप्तीकर** भरतो.

आपण खरेदी केली तरी

आपण **विक्रीकर** भरतो

आपल्याला मनोरंजनाची इच्छा

झाली तर **करमणूक कर** भरावा लागतो.

# ....१९७१ ते १९९५

प्रयत्नांनी बचत केली तर
**संपत्ती कर** भरतो.

आपण आपली मालमत्ता विकली तर
**भांडवल-प्राप्तीकर** भरतो.

सढळ हाताने कुणाला काही द्यावे वाटले
की आपण **उपहार-कर** (Gift Tax) भरतो.

मेल्यावर सुद्धा आपण आनंदाने
**मालमत्ता-कर** भरतो.

# ....१९७२ ते १९९५

अगदी स्वर्गाच्या प्रवासाला जायचे असले तरी आपल्याला तऱ्हेतऱ्हेचे **फॉर्म** भरावे लागतात.

**स्वतंत्र पक्ष :**

कल्याणकारी समाजासाठी,
निरंकुश सत्तेत परिवर्तितीत होणाऱ्या समाजवादी राज्यव्यवस्थेसाठी नाही.

**स्वतंत्र पक्ष :**

सामाजिक न्यायाचा पाठीराखा,
शासनाच्या निरंकुश सत्तेचा कट्टर विरोधक.

**स्वतंत्र पक्ष म्हणजे :**

शेतकऱ्यांना स्वातंत्र्य,
उद्योगांना स्वातंत्र्य,
व्यापाराचे स्वातंत्र्य
धर्माचे स्वातंत्र्य
आणि
श्रमाने व बचतीने जमविलेल्या
मालमत्तेच्या मूलभूत हक्काची
जोपासना

**शेतकऱ्यांचा बाजूचा निर्णय दिल्लीहून पुण्यात पोहोचायला चार दिवस**

# सर्वांच्या उसाला ६००+१४० चा भाव द्या.

**सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय**

पुणे : "सर्व साखर कारखान्यांनी सभासद व बिगर सभासद असा भेदभाव न करता सरसकट सर्व ऊस उत्पादकांना प्रति टनाला ६०० रुपये भाव द्यावा आणि उर्वरित १४० रुपयांची बँक हमी साखर आयुक्तांच्या नावाने देवून या दराने रकमचे त्वरित वाटप करावे," असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १७ जानेवारी १९९३ रोजी दिली.

"कन्नड सहकारी साखर कारखाना व बेलगंगा सहकारी साखर कारखाना यांनी औरंगाबाद न्यायालयात ऊस भावाच्या निश्चितीसाठी याचिका दाखल केलेली होती. औरंगाबाद न्यायालयाच्या निर्णयानंतर कन्नड कारखान्याने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. या अपिलात कन्नड कारखान्याने 'बिगर सभासदांना राखीव झोनमध्ये असल्यामुळे त्याच कारखान्यास ऊस घालणे सक्तीचे आहे काय?' या विषयावर निर्णय द्यावा, अशी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली होती. या विषयासंबंधी औरंगाबाद आणि मुंबई उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयामध्ये तफावत निर्माण झाल्यामुळे सदरच्या विषयाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होऊन ३४० रुपये प्रतिटनास ठरविलेला शासकीय दर बाजारभावाने असलेला रुपये ७४० दर याचा विचार करून व तफावत लक्षात घेऊन सर्व ऊस उत्पादकांना प्रतिटनाला रोखीने ६०० रुपये दर तात्पुरता द्यावा आणि रुपये १४० प्रति मे. टनास या दराने उरलेल्या रकमेची बँक हमी साखर आयुक्तांच्या नावाने द्यावी असा निर्णय आहे. सरन्यायाधीश वेंकटचलय्या, न्या. एस्. एस्. मोहन आणि न्या. एफ्. पंडियान यांच्या खंडपीठाने दिली आहे, अशी माहिती ॲड. श्रीपाद खुर्जेकर यांनी आज येथे दिली.

"या निर्णयाची अंमलबजावणी १७ जानेवारी १९९४ पासून उच्च न्यायाने निर्णय घेतल्यानंतर चार आठवडे चालू राहिल असेही निकालपत्रात म्हटले असल्याचे ॲड. खुर्जेकर यांनी सांगितले.

पश्चिम महाराष्ट्रातील काही मूठभर साखर कारखाने सोडले, तर राज्यातील इतर कारखान्यांची परिस्थिती टनाला चारशे रुपयांपेक्षा अधिक भाव देण्याची नाही. अनेक साखर कारखाने शासनाने जाहीर केलेला किमान ऊसदरही कसाबसा देत आहेत.

सकाळ २१/१/१९९४ वरून

*'माल आमचा, मालक आम्ही' अशी घोषणा करणाऱ्या उत्पादक शेतकऱ्यांनी आता कारखाने 'कोर्टाचा अवमान' करीत नाहीत हे पाहाणे गरजेचे आहे.*

# शेतकरी महिला आघाडी आक्रमक पवित्र्यात

शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकारिणीची बैठक ६ जानेवारी १९९४ रोजी येवला येथे पार पडली. या बैठकीत औरंगाबाद अधिवेशनात झालेल्या ठरावांच्या अनुषंगाने शेतकरी महिला आघाडीच्या आगामी कार्यक्रमांच्या आखणीसंबंधी चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

१) ज्या ज्या गावी दारूची सरकारमान्य दुकाने आहेत त्या त्या गावी २६ जानेवारी १९९४ रोजी होणाऱ्या ग्रामसभांमधून दारू दुकानबंदीचे ठराव करण्यात येतील.

२) जळगाव जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रमांतर्गत लक्ष्मीच्या नावे खातेफोड करण्यासाठी संबंधित महिलेचा आपला हिस्सा मिळण्यासाठी अर्ज असावा अशी सूचना केली आहे.

गावतील महिलांचे असे अर्ज घेऊन त्यावर कुटुंबातील खातेदाराचीही संमतीदाखल सही घेऊन 'लक्ष्मीमुक्ती' चा हा प्रयोग करून पाहावा; त्याला सरकारी अधिकारी कसा प्रतिसाद देतात हे पाहून या कार्यक्रमाला व्यापक स्वरूप देण्यासंबंधी निर्णय घेण्यात येईल.

सौ. इंदिराबाई पाटील यांनी विटनेर व विटनेरच्या परिसरांतील गावांत हा प्रयोग करण्याची जबाबदारी घेतली आहे.

३) शेतकरी महिलांना बाजारच्या दिवशी आपला माल बाजारात नेतांना बाजारच्या वाटेवर गुंड खरेदीदारांच्या दबावतंत्राला तोंड द्यावे लागते. विशेषतः शेळ्या, कोंबड्या बाजारात नेतांना हा त्रास जास्त होतो. वाटेवरच्या खरेदीदाराने एकदा किंमत, किती का कमी असेना, केली की तो माल त्याला न विकता बाजारात नेला तरी बाजारातील व्यापारी त्या मालाच्या बाबतीत, तो दुसऱ्या व्यापाऱ्याने आधीच 'हेरला' आहे म्हणून 'चढा' सौदा करीत नाही. माल वाटेवरच अशा तऱ्हेने 'हेरण्या'साठी हे लोक शेळीचे केस कापणे, कोंबडीची पिसे उपटणे किंवा त्यांच्यावर विशिष्ट रंग टाकणे असे प्रकार करतात. या गुंडगिरीला आळा घालण्यासाठी कोणतीच यंत्रणा नाही.

शेतकरी महिला आघाडीने या गुंडगिरीला विरोध करण्याचा निर्णय घेतला असून गावातील सर्व महिला अशा तऱ्हेने दबावतंत्र वापरणाऱ्या खरेदीदाराचे डोक्यावरील किंवा असल्यास दाढीचे केस कापतील किंवा इतर मार्ग अवलंबतील.

ज्या गावातील शूर महिला हा कार्यक्रम राबवू इच्छितील त्यांच्या या कार्यक्रमात शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा आमदार सौ. सरोज काशीकर पूर्वसूचना पुरेशी आधी मिळाल्यास सहभागी होतील.

या बैठकीला शेतकरी महिला आघाडीच्या सदस्यांसह शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व इतर प्रमुख कार्यकर्ते हजर होते.

## आंबेठाणच्या फोनमधील बदल

चाकण हे आता एसटीडी वरील केंद्र झाले असून त्याचा क्रमांक 02135 आहे.

श्री. शरद जोशी यांचा आंबेठाणचा फोन क्रमांक यापुढे 52354 हा असेल.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 25th January, 1994

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
January 21, 1994

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

# .... तर मदतीसाठी पुढे याल?

शेतकरी संघटनेचे काही कार्यकर्ते एकत्र बसले. छोटा चोर आणि मोठा चोर राजकीय पक्ष बाजूला टाकून लोकांच्या इच्छांना राबवणारा पक्ष परमेश्वरी कृपेने किंवा काही चमत्काराने तयार झाला तर त्याचा कार्यक्रम काय असेल? किंवा लहानपणच्या गोष्टीतल्याप्रमाणे देव प्रसन्न झाला आणि म्हणाला,

"महाराष्ट्रात शासन सुधारले पाहिजे, सुधारले पाहिजे म्हणतात. नेमके काय पाहिजे ते सांगा. मी तुम्हाला वर देतो, तुम्ही ज्याची इच्छा कराल ती सुधारणा होईल.'

तर सामान्य लोक काय उत्तर देतील? नुसते रामराज्य, बळिराज्य असले शब्द वापरून भागणार नाही. महाराष्ट्र राज्यात घडवून आणायचे, ते देखील जास्तीत जास्त पाच वर्षात, बदल कोणते?

संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मागायच्या बदलांची यादी कली ती पुढीलप्रमाणे :

**१) कायदा आणि सुव्यवस्था**

१.१) पोलिस खात्यातील भ्रष्टाचारी, अकार्यक्षम अधिकारी आणि शिपाई यांना निवृत्त करणे.

१.२) गुंड, तस्कर, गुन्हेगार यांचा निष्ठूरपणे बंदोबस्त करणे.

१.३) गेल्या काही वर्षांत असमर्थनीय प्रचंड धनसंपत्ती जमवलेल्यांची सार्वजनिक चौकशी

**२) प्रशासकीय काटकसर**

२.१) नवीन नोकरभरती थांबविणे, आवश्यक तेथे भरती जास्तीत जास्त पाच वर्षांच्या मुदतीकरिता करणे.

२.२) राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारेपर्यंत पगार आणि भत्ते गोठविणे. शनिवारच्या सुट्ट्या बंद आणि धार्मिक सणांच्या सुट्ट्यांच्या यादीतील जास्तीत जास्त पाच ऐच्छिक सुट्ट्या घेण्याची मुभा.

२.३) अनावश्यक नोकरदारांना उपयोगी कामांना (उदा. धरणे, कालवे, रस्ते, लोहमार्ग, पिण्याचे पाणी) लावणे.

**३) वित्तीय व्यवस्था**

३.१) व्यापारी, कारखानदारी यासंबंधीची सर्व खाती, महामंडळे आणि आयोग बंद करणे.

३.२) विक्री कर, जकात कर, उसावरील खरेदी कर रद्द करणे.

३.३) कारखानदारीच्या बाबतीत उत्पादनक्षमता, वाहतुकीच्या बाबतीत वाहतूकक्षमता, व्यापार आणि व्यवसाय यांच्या बाबतीत वापरातल्या जागेचे क्षेत्रफळ, विभाग आणि उलाढालीचे स्वरूप यांच्या आधाराने करांची आकारणी करणे; ज्यामध्ये कोणाही करवसुली अधिकाऱ्याला उद्योजकांच्या हिशोबांच्या वह्या तपासण्याची मुभा राहाणार नाही.

३.४) सुरक्षा, पर्यावरण आणि सामाजिक नियंत्रण यासाठी सरकारी देखरेखीच्या सर्व व्यवस्था बंद करणे. त्या जागी लेखापरीक्षां (Audit) प्रमाणे सुरक्षा परीक्षा, पर्यावरण परीक्षा आणि सामाजिक नियंत्रण परीक्षा प्रमाणपत्रे आवश्यक करणे.

**४) व्यापारी व इतर व्यवस्था**

४.१) कापूस एकाधिकार खरेदी, आदिवासी शेतीमाल एकाधिकार खरेदी, कृषि उत्पन्न बाजार समिती यांतील मक्तेदारी प्रस्थापित करणाऱ्या अटी रद्द करणे.

४.२) जमीन संपादनासंबंधीचे कायदे, जीवनावश्यक वस्तूंचा कायदा, भाडेनियंत्रण कायदा, शहरी कमाल जमीनधारणा कायदा रद्द करणे.

४.३) सार्वजनिक वितरण व्यवस्था, स्वस्त धान्याची दुकाने बंद करणे. दारिद्र्य रेषेखालील लोकांना आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी टपालाने कूपने पुरविण्याची व्यवस्था करणे.

४.४) उत्पादन, व्यापार आणि निर्यात यावरील सर्व सरकारी बंधने उठविणे.

४.५) सहकारी क्षेत्रावरील सर्व सरकारी नियंत्रण आणि सरकारी मदती बंद करणे.

४.६) सरकारी कृषिविस्तार योजना बंद करणे.

४.७) मालमत्तेचे सर्व हक्क विवाहित व्यक्तींच्या बाबतीत पतीपत्नींच्या नावे संयुक्तपणे नोंदविणे.

**५) समाजकल्याण**

५.१) शिक्षण क्षेत्रास संस्था उघडणे, अभ्यासक्रम ठरवणे, परीक्षा, मूल्यांकन, निधी उभारणी, नोकरदारांचे पगार यांबाबतीत संपूर्ण स्वायत्तता देणे.

५.२) १४ वर्षे वयापर्यंत संपूर्ण मोफत व सर्वांना सक्तीचे शिक्षण.

५.३) सरकारी वैद्यकीय सेवांच्या व्यवस्थेत नोकरदारांच्या पगारभत्त्यांचे प्रमाण ९५% वरून २५% पर्यंत खाली आणणे.

५.४) गुरुद्वारातील लंगरांप्रमाणे निराधार, अपंग इत्यादींची तात्पुरती सोय लावणाऱ्या संस्थांना उत्तेजन देणे.

५.५) गावाचा सर्व कारभार पंचायतीच्या हाती ठेवणे, तसेच गावातील स्थावर जंगम मालमत्तेसंबंधीचे विवाद आणि हत्या सोडून इतर सर्व अपराधप्रकरणे यांचा न्यायनिवाडा पंचायतीच्या हाती ठेवणे.

या यादीतील कार्यक्रम पाच वर्षांत प्रत्यक्षात उतरले तर जनसामान्यांचे जिणे मोठे आनंदाचे होईल. यादीत सगळेच काही मुद्दे आले आहेत असे नाही. पण यादी फार लांबलचक होऊ द्यायची नाही, मुद्दे मोजकेच ठेवायचे आणि पाच वर्षांत कार्यवाहीत आणता येईल असाच कार्यक्रम ठेवायचा असा कार्यकर्त्यांचा आग्रह होता. असा जाहिरनामा घेऊन कोणी प्रामाणिक सचोटीची मंडळी पुढे आली तर त्यांच्या मदतीसाठी तुम्ही पुढे याल?

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.-०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक — मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.